महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर
Government Medical College, Chandrapur - 442401, Maharashtra, INDIA
Telephone No. 07172- 277104 Fax No. 07172- 277103
Website : www. gmcchandrapur.org Email – gmcchandrapur@gmail.com

जा.क्र.शावैमचं/आस्था 1.2 / कंत्राटी अध्यापक जाहिरात/9582-83/2023 दि. 30/11/2023

प्रति,
मा.संचालक,
माहिती व प्रसिध्दी संचालनालय,
जनसंपर्क कार्यालय, जुने सचिवालय,
सिव्हिल लाईन, नागपूर.

**विषय :-** वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथील चिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

महोदय,

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथील चिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पेदे करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता या पत्रासोबत जोडण्यात येत असलेली जाहीरात सुचना जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव व दुरध्वनी व इमेल पत्ता | शासकीय वैद्यकीय महावद्यालय,चंद्रपूर<br>सिव्हील लाईन , रामनगर, चंद्रपूर.<br>gmcchandrapur@gmail.com |
| २ | जाहीरातीची सूचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दि.०७.१२.२०२३. |
| ३ | प्रसिध्दीकरीता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्त खप असलेल्या राज्यस्तरीय अग्रगण्य एक मराठी व एक इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये. |
| ४ | किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे. | एक वेळा |
| ५ | देयक प्रदान करण्याकरीता कोणत्या नावाने पाढविण्यात यावे. | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महावद्यालय,चंद्रपूर |

सोबत :- जाहिरातीची सुचना व जाहिरातीची प्रत.

(डॉ. मिलिंद फुलपाटील)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर.

प्रत - मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर
Government Medical College, Chandrapur - 442401, Maharashtra, INDIA
Telephone No. 07172- 277104 Fax No. 07172- 277103
Website : www. gmcchandrapur.org Email – gmcchandrapur@gmail.com

जा.क्र.शावैमचं/आस्था 1,2 / कंत्राटी अध्यापक जाहिरात/ 9581 /2023 दि. 30 /11/2023

# :: जाहिरातीची सूचना ::

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यांच्या आस्थापनेवर वैद्यकिय अध्यापन व रुग्णसेवा याकरिता चिकित्सालयीन व अतिविशेषोपचार या विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे (कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवारांना करार पध्दतीने नियुक्ती देण्यासाठी संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर दि.०७/१२/२०२३ रोजी सविस्तर जाहीरात प्रसिध्दकरण्यात येत आहे.

(डॉ. मिलिंद फुलपाटील)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर.

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर
Government Medical College, Chandrapur - 442401, Maharashtra, INDIA
Telephone No. 07172- 277104 Fax No. 07172- 277103
Website : www. gmcchandrapur.org Email – gmcchandrapur@gmail.com

जा.क्र.शावैमचं/आस्था 1,2 / कंत्राटी अध्यापक जाहिरात/ 9580 /2023 दि. 30/11/2023

# :: जाहिरात ::

विषय :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथील चिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत..

संदर्भ :-१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/ वैसेवा-३, दिनांक ०९.०२.२०२२.

३.मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/जाहिरात/करार/ २५९३/२०२३, दिनांक २५/०८/२०२३.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथील चिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पेदे संस्थास्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांकडुन मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.in या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांच्या कालावधीपर्यंत (सायंकाळी५.०० वाजेपर्यंत शासकीय सुटी वगळुन) अर्ज ऑनलाईन Upload करणे अनिवार्य राहील. अर्ज करण्यासाठी लिंक www.med-edu.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच मुलाखतीचा दिनांक तसेच नियुक्तीबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. मिलिंद फुलपाटील)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर रिक्त पदांचा तपशिल

रिक्त पदाचा तपशिल

संवर्ग : प्राध्यापक

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणीक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | मनोविकृतीशास्त्र | १ | M.D. (Psychiatry), M.D. (Psychological Medicine), M.D. (Medicine With Diploma in Psychological Medicine), DNB (Psychiatry) | As per notification 14.02.2022<br>I). Associate Professor in the subject for 3 years in a permitted/Approved/recognized medical college/institutional) Should have at least four four Research Publications (at least two as Associate Professor) (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, PubMed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded Embrace, cupus, Directory of Open Excess journals (DoAJ) will be considered). The authors must be amongst first three or should be the corresponding author.<br><br>III) Should have completed the basic course in biomedical research from institution(s) designated by NMC |
| २ | कान,नाक व घसाशास्त्र | १ | M.S (Oto-Rhnio-Laryngology) DNB(Oto-Rhnio-Laryngology) | |
| ३ | बधिरीकरणशास्त्र | १ | M.D. (Anesthesiology) DNB ( Anesthesiology) | |
| ४ | क्ष-किरणशास्त्र | १ | MD (Radio-diagnosis)/MD Radiology)/ DNB (Radio-diagnosis)/(Radiology) | |

टिप - सदर जाहिरातीमधील नमुद पद संख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

(डॉ.मिलींद फुलपाटील)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर रिक्त पदांचा तपशिल

रिक्त पदाचा तपशिल

संवर्ग :सहयोगी प्राध्यापक

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणीक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | क्ष-किरणशास्त्र | १ | MD (Radio-diagnosis)/MD Radiology)/<br>DNB (Radio-diagnosis)/(Radiology) | As per notification 14.02.2022<br>Assistant Professor in subject for 4 years in permitted /approved/recognized medical college/institution<br>ii) Should have at least Two Research publication (only original paper, met analysis, Systematic reviews and case series that are published in journals indexed in medicine, PubMed central citation index, Science citation index, Expanded Embays, Scopus Directory of open Excess journals (DoAJ) will be considered. ) The author must be among the first three or should be the corresponding author.<br>iii) Should have completed the basis course in biomedical course in biomedical research from institution(s) designated by NMC. |
| २ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | १ | M.S.(Obstetrics and Gynecology)<br>D.N.B. (Obstetrics and Gynecology) | |

टिप - सदर जाहिरातीमधील नमुद पद संख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

(डॉ.मिलींद फुलपाटील)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

**महत्वाची टिप :-**

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२. उमेदवाराचे वय : नियुक्ती वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४. मानधन :

(अ) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

(ब) खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) यांना खालील नमूदप्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक | चिकित्सालयीन | रु. २,००,०००/- | शासन निर्णय दि.०९.०२.२०२२ अन्वये दुरस्थ क्षेत्रात स्थापन होणा-या संस्थेसाठी लागुअसलेले मानधन |
| २. | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन | रु. १,८५,०००/- | |

५. गुणांकन पध्दत :- जाहीराती सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-अ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

(१) परिशिष्ट - अ मध्ये नमूद नुसार अ.क्र.१ ते ४ वरील एकुण-८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

(२) प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणापैकी किमान ४१ % किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरीता विचार केला जाईल.

**नियम व अटी :-**

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहू पदावर नियमित उगेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहील.

२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा -यांवर विपरीत परिणाम होणर नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रादान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१०. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदर जाहिरात मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णःरद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१३. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठातांना राहतील.

१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल.)

१७. मुलाखतीला येतांना उमेदवारांनी Online सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

(डॉ.मिलींद फुलपाटील)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
चंद्रपूर